आरोग्य कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. एच.ओ./१०६३८
दिनांक.२३/०३/२०२०

## - आदेश -

**विषय –** **कोरोना प्रतिबंधाकरीता परदेशातून प्रवास करून आलेल्या व्यक्तींसंबंधी करावयाचे कार्यवाहीबाबत.**

पुणे शहरामध्ये कोरोना विषाणूचा प्रसार होऊ नये यासाठी परदेशातून प्रवास करून आलेल्या व्यक्तींबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

परदेशातून पुणे शहरात आलेल्या व्यक्तींची यादी उप आयुक्त, मालमत्ता व्यवस्थापन यांनी प्रमाणित करावी. तसेच ज्या व्यक्तींना त्यांचे घरी पुरेशा जागे (स्वतंत्र खोली) अभावी स्वतःचे अलगीकरण करणे शक्य नाही अशा व्यक्तींचे घराची पाहणी करून अशा व्यक्तींची यादी संबंधीत परिमंडळ कार्यालयाकडील उप आयुक्त यांनी प्रमाणित करावी. सदर प्रमाणित याद्यांमधील व्यक्तींव्यतिरिक्त अन्य कोणासही पुणे मनपाचे क्वारंटाईन सेन्टर्स (अलगीकरण कक्ष) मध्ये प्रवेश दिला जाणार नाही याची जबाबदारी संबंधित क्वारंटाईन सेन्टर्स (अलगीकरण कक्ष) प्रमुख यांची असेल.

परदेशातून पुणे शहरात आलेल्या कोरोनाची लक्षणे नसलेल्या व लक्षणे असलेल्या व्यक्तींबाबत पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

**(अ) परदेशातून आलेल्या व्यक्तीस कोरोनाची लक्षणे नसल्यास –**

१. परदेशातून आलेल्या व्यक्तीस कोरोनाची लक्षणे दिसून येत नसल्यास अशा व्यक्तींच्या हातावर होम क्वारंटाईन चा शिक्का मारून घरी स्वतंत्र खोलीमध्ये स्वतःचे अलगीकरण करून, कुटुंबियांमध्ये अथवा अन्य व्यक्तींमध्ये न मिसळण्याबाबत तसेच घराबाहेर न पडण्याबाबत सूचना द्याव्यात.
२. परदेशातून आलेल्या व्यक्तीस होम क्वारंटाईन (घरी अलगीकरण) करण्यास त्याचे कुटुंबीय, शेजारी, सोसायटी मधील रहिवासी अथवा अन्य कोणीही विरोध केल्यास संबंधितांविरुद्ध फौजदारी कारवाई प्रस्थापित केली जाऊ शकते याबाबतची जाणीव परदेशातून आलेल्या व्यक्तीस करून द्यावी.
३. परिमंडळ कार्यालयाकडील उप आयुक्त यांनी प्रमाणित केलेल्या यादीतील घरी पुरेशी जागा (स्वतंत्र खोली) उपलब्ध नसलेल्या व्यक्तीस पुणे मनपाने निर्माण केलेल्या क्वारंटाईन सेन्टर्स (अलगीकरण कक्ष) कडे संदर्भित करावे.
४. क्वारंटाईन सेन्टर्स (अलगीकरण कक्ष) चे प्रमुख यांनी अशा व्यक्तींचा प्रवेश नाकारू नये.
५. क्वारंटाईनचा (अलगीकरणाचा) ठराविक कालावधी संपल्यानंतर संबंधित रुग्णास आवश्यक सूचना देऊन घरी सोडावे.

Scanned with CamScanner

**(ब) परदेशातून आलेल्या व्यक्तीस कोरोनाची लक्षणे असल्यास –**

१. परदेशातून आलेल्या व्यक्तीस कोरोनाची लक्षणे दिसून येत असल्यास अशा व्यक्तींना तातडीने रुग्णवाहीकेमार्फत सर्व आवश्यक दक्षता घेऊन पुणे मनपाचे डॉ.नायडू रुग्णालय येथे पाठवावे.

२. तसेच पुणे मनपाने निर्माण केलेल्या क्वारंटाईन सेन्टर्स (अलगीकरण कक्ष) मध्ये दाखल असलेल्या कोणत्याही व्यक्तीस कोरोनाची लक्षणे दिसू लागल्यास अशा व्यक्तीस देखील तातडीने रुग्णवाहीकेमार्फत सर्व आवश्यक दक्षता घेऊन पुणे मनपाचे डॉ.नायडू रुग्णालय येथे पाठवावे.

उपरोक्त कार्यवाहीमध्ये कोणत्याही अधिकारी / कर्मचारी यांचेकडून हलगर्जी होणार नाही याची दक्षता घ्यावी. सदर कार्यवाहीमध्ये अडथळा निर्माण करणाऱ्यांविरुद्ध आय.पी.सी. चे कलम १८८ अंतर्गत कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

कळावे.

(शान्तनु गोयल)
अति.महा.आयुक्त (विशेष)
पुणे महानगरपालिका

प्रत –

१.मा.महापालिका आयुक्त, पुणे मनपा.
२.मा. अति.महा.आयुक्त (जनरल), पुणे मनपा.

यांजकडेस माहितीसाठी.

प्रति –

१. सर्व संबंधित मा. खाते प्रमुख, पुणे मनपा.

Scanned with CamScanner